मार्च-18

2017/18





रयत शिक्षण संस्थेचे,

# महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल. जि. रायगड – ४१०२०६

Accredited at 'A' Grad by NAAC (Third Cycle CGPA – 3.18)

'Best College Award' By University of Mumbai


## मराठी विभाग आयोजित

## एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

# "जागतिकीकरण आणि मराठी साहित्य प्रवाह"

## बुधवार दि. २८ मार्च २०१८

# शोधनिबंध पुस्तिका



**संपादक**

प्रा. चिंतामण धिंदळे

मराठी विभाग प्रमुख

**प्रकाशक**

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर

महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल

जि. रायगड – ४१०२०६

ISBN NO :978-93-5311-692-7

ISBN NO :978-93-5311-692-7

प्रकाशक :
प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर
महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
पनवेल, जि. रायगड – ४१०२०६

संपादक :
प्रा. चिंतामण धिंदळे
मराठी विभाग प्रमुख

सर्व हक्क :
रयत शिक्षण संस्थेचे,
महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
पनवेल, जि. रायगड – ४१०२०६ (महाराष्ट्र.)
फोन नं. :- (०२२) २७४५२५६१, २२९२३५९२
Website :- www.mpasccollege.com
Email :- prinmpascpanvel@yahoo.co.in

प्रथम प्रकाशन :
२८ मार्च २०१८
मुखपृष्ठ : प्रा. एस.एल.गोवे
कलानिर्देशन : प्रा. डॉ. अतुल चौरे

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्रानिमित्त संपादित केलेल्या शोधनिबंध पुस्तिकेतील शोधनिबंध लेखकांच्या विचारांशी संपादक, प्रकाशक, महाविद्यालय व संस्था सहमत असेलच असे नाही. शोधनिबंध लेखकांची त्यांच्या विषयानुसार ती त्यांची वैयक्तिक मते व निष्कर्ष आहेत.

\- संपादक

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | मराठीची वैश्विकता आतून बाहेरून | डॉ. भास्कर हांडे (कवी व चित्रकार, नेदरलँड) | ०१ – ०६ |
| ०२ | स्त्रीवादी चळवळ आणि स्त्रीवादी साहित्यणे व अपेक्षाकाही निरीक्ष - | प्रा. कल्याणी झा. | ०७ – ०९ |
| ०३ | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कादंबरी | प्रा.निलेश लंगोटे | १० – ११ |
| ०४ | जागतिकीकरण आणि ग्रामीण कविता | प्रा. डॉ. बी. व्ही. डिगोळे | १२ – १४ |
| ०५ | जागतीकीकरण आणि मराठी कादंबरी | प्रा.डॉ.पंढरी डोईफोडे | १५ – १६ |
| ०६ | जागतिकीकरणाच्या प्रभावातील १९९० नंतरची मराठी कादंबरी | प्रा. प्राची जोशी | १७ – २१ |
| ०७ | जागतिकीकरण व मराठी विज्ञान साहित्यातील बदलते स्वरूप | प्रा. अजितकुमार पाटील | २२ – २५ |
| ०८ | जागतिकीकरणाच्या प्रकियेत महानगरीय कवितेचे वेगळेपण | डॉ. दिपक सूर्यवंशी | २६ – २९ |
| ०९ | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | डॉ. विठ्ठल केदारी | ३० – ३१ |
| १० | ज्गतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य प्रवाह | प्रा. दिलीप कोने | ३२ – ३३ |
| ११ | जगतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य प्रवाह | प्रा. सुहास मोरे | ३४ – ३५ |
| १२ | जागतिकीकरणातील कवितेचे बदलते स्वरूप | डॉ.विशाल लिंगायत | ३६ – ३९ |
| १३ | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा. राजू शनवार | ४० – ४० |
| १४ | जागतिकीकरणानंतरच्या मराठी कवितेतील चित्रण 'स्त्री' | डॉ. दत्तात्रय डांगे | ४१ – ४३ |
| १५ | जागतिकीकरण व मराठी कविता | डॉ. अंजली मस्करेन्हस | ४४ – ४५ |
| १६ | जागतिकीकरणात मराठी लोककलांचे स्थान | डॉ . गोकुळ शिखरे | ४६ – ४८ |
| १७ | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा. सुलोचना दंतराव | ४९ – ५० |
| १८ | जागतिकीकरणात मराठी आदिवासी साहित्याचे योगदान | प्रा. विजयश्री गवळी | ५१ – ५३ |
| १९ | १९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीतील शेतकरी जीवन | प्रा. राजश्री कदम | ५४ – ५५ |
| २० | जागतिकीकरण आणि यशवंत मनोहर यांची कविता | प्रा. मधुकर जाधव | ५६ – ५७ |
| २१ | मराठी कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण | डॉ.पांडुरंग भोसले | ५८ – ६१ |
| २२ | जागतिकीकरण आणि साठोत्तरी मराठी ग्रामीण कविता | डॉ. नामदेव शिंदे | ६२ – ६६ |
| २३ | जागतिकीकरण व आदिम कविता:वास्तवतेचा प्रखर आविष्कार | प्रा. अनिता सुरकुले | ६७ – ७१ |
| २४ | जागतिकीकरनात तमाशा लोककलेचे स्थान | श्री. गोरक्षनाथ घोलप | ७२ – ७४ |
| २५ | आंबेडकरवादी बौध्द साहित्याचे प्रयोजन | प्रा. एस. एल. म्हात्रे | ७५ – ७६ |
| २६ | जागतिकीकरणातील आदिवासी | डॉ. संजय सुरेवाड | ७७ – ७८ |
| २७ | जागतिकीकरण आणि मराठी कवितेतील स्त्रीवादी चित्रण | प्रा. बहुले विकास | ७९ – ८२ |
| २८ | जागतिकीकरण आणि आंबेडकरवादी साहित्य प्रवाह | प्रा. सोपान पवार | ८३ – ८४ |
| २९ | जागतिकीकरणाचे स्वरूप व मराठी भाषेवरील प्रभाव | डॉ. द. के. गंधारे | ८५ – ८६ |
| ३० | Impact of Globalization on Tourism in India | Prof. Dr. Vishwas Chavan | ८७ – ९० |
| ३१ | जागतिकीकरणात ग्रामीण कविता | प्रा. ब्राळासो सुतार | ९१ – ९२ |
| ३२ | जागतिकीकरण आणि मुस्लिम मराठी साहित्य प्रवाह | प्रा. एफ. एन. पटेल | ९३ – ९४ |
| ३३ | जागतिकीकरण आणि बदलता भाषिक सांस्कृतिक परीघ | डॉ. गजानन जाधव | ९५ – ९५ |

# जागतीकीकरण आणि मराठी कादंबरी

डॉ.पंढरी डोईफोडे
सिंदखेड राजा

**प्रस्तावना :**

जागतिकी करण्याच्या प्रभावी अंमल यंत्रणेमुळे मानवी जीवन शैली बदलुन गेली आहे. बाजार, ग्राहक व विकी मुल्यांना अतोनात महत्व आले आहे. बदलत्या जीवनशैली बरोबर एकनवी मुल्यव्यवस्था अस्तित्वात आली. बाजार या गोष्टीला फार महत्व प्राप्त झाले. त्या नजरेतुनच सगळे वास्तव उभे राहु लागले. राक्षसी मॉलची संस्कृती उभारली जातेय. लघु उघोग, बारके–बारके व्यापार नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जागतिकीकरणाच्या काळात बाजार पेठेचे तंत्र प्रभावी ठरत असल्यामुळे ग्रंथव्यवहार व वितरणावर देखिल त्याचा परीनाम झाला आहे. गेल्या काही वर्षात ग्रंथव्यवहारात नव्या बाजाराचा चंचुप्रेवश झाला आहे. अनेक परदेशस्य नावाजलेले प्रकाशक आता मराठीतुन पुस्तके प्रकाशित करत आहेत. मृद्रित ग्रंथाबरोबर ध्वती व चित्रफितीचे संयोजन असलेले ग्रंथ प्रकाशित केले जात आहेत. भविष्यात छापील स्वरूपात पुस्तके वाचक वाचतील की नाही एवढा तंत्र ज्ञानाचा पसारा विस्तावलेला आहे ई सिटरेचरचे प्रमाण वाढते आहे. वेगवेगळया प्रकारची पुस्तके आता ई स्वरूपात उपलब्ध होत आहेत. तसेच गेल्याकाही वर्षात व्यक्तीगत पातळीवरचे ब्लॅाग सुरू झाले आहेत. या ब्लॅागवरूनही आपले विचार व भावना व्यक्त केल्या जात आहेत. या ब्लॅगकरूनच कविता, कथा,कांदब–या प्रसिध्द होऊ लागल्या आहेत.

मराठी साहित्यात या बदलांचे चित्रन चांगल्या प्रकारे आले आहे. या साहित्य प्रकारांची या स्थित्यंतराची चांगली दखल घेतली आहे. प्रत्येक लेखक या बदलाला सामोरा गेला व अभिव्यक्त झाला आहे. कांदबरीत या साज्यांचे सुक्ष्म चित्रन आल्याचे दिसते. जागतिकीकरणाने देशी–परदेशी खाजगी भांडवल भारतात आले. त्यातुन फायदेशिर ठरणाच्या उप्रयांना प्रामुख्याने उठाव आला. पारंपारीक शेती मागे पडली त्याचे खेडयावर व खेडयातील अशे व्यवहारांवर प्रतिकुल परीनाम झाले. ग्रामिण जीवनाचे चित्रण करणा–या कांदब–यामधुनही जागतिकीकरणाचे पडसाद उमटले आहेत. विशेषतः इथला शेतकरी त्यांच्या शेतीमधुन कसा उखडला गेला आहे याचे चित्रण, प्रतिमा इंगोले, सदानंद देशमुख, शंकर सखाराम, प्रविण बांदेकर, गणेश आवटे यांच्या कांदब–यातुन हे प्रथम झाले आहे.

डॉ.प्रतिमा इंगोले यांची 'बुढाई' ही कांदबरी या कांदबरीत निरनिराळया सरकारी योजनामुळे ग्रामिण महाराष्ट्राची झपाटयाने आणि सर्वागिण प्रगती होण्याची चिन्हे दिसत असली तरी जागतिकी करणामुळे ग्रामिण जीवनातील दुःख दैन्य,दारीद्र समुळ नष्ट होऊ शकले नाही. ग्रामिण जीवनाच्या हया स्थितीचे, बदलत्य ग्रामिणतेचे नवे रूपदर्शन घडविण्या–या कलात्मक साहित्यांचे चिंतन होते आवश्यक होते याचे चित्रण हया कांदबरीत येते. 'बुढाई' वाचल्यावर एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे अस्सल कांदबरीच्या कसोटीवर उतरणारी ही कांदबरी शहरी अतिकमण, माणसा–माणसामधिल तणाव महागाई ग्रस्त होणारे लोकजीवन असे अनेक पदर हया कांदबरीच्या विविध घटकांचे मिश्रण एकजीवपण साधले आहे. मानवी संवेदनशील मत अस्वस्त करून सोडण्याचे सामर्थ या कांदबरीत आहे. उन्हाळा, पावसाळा या सृष्टीचकामुळे जमिनीला पडलेल्या भेगा, मातीचे उदासवाणे रूप माणसाच्या आयुष्याचेच जणु प्रतिकात्मक रूप असते. गावपातळीवर सामाजिकस्तर, व्यवस्थेची उतरंड ताणतणाव यांचे वास्तव चित्रण, स्त्रीच्या होणा–या सर्वांगिक कोंडीचे दर्शन या कांदबरीत जागतिकी करणामुळे घडल्याचे दिसुन येते.

जागतिकीकरणामुळे उद्योग खाजगी झाले. खते बी–बियाणे यांच्या किंमती प्रचंड वाढल्या. शेतक–याल्या परेणी करताणाच कर्ज काढुन पेरणी करावी लागु लागली. या सर्वाचे एकदृष्टचकच सुरू झाले. 'बोरामास' मध्ये याचे चित्रण एकनाथ व वडील सुभानराव यांच्या परिस्थितीवरून लक्षात येते. सुभानरावांची आत्महत्या ही जागतिकी करणाचा खडीच ठरते. खेडयात शिक्षण पोहेचले परंतु हाताला काम नाही म्हणुन बेकारी वाढली यातुनच एकनाथचा धाकटा भाऊ मधु आणि इतर लाच देवुनही नोकरी न मिळाल्यामुळे रस्त्यावरच्या अलिशान गाडयांना गुप्तधन मानुन लुटण्याचा प्रयत्न करतो. नोकरदारांला वाहन घेण्यासाठी त्वरीत कर्ज मिळते. मात्र शेतक–याला आवश्यक बी–बियाण्यांच्या खरेदीसाठी बॅक कर्ज देत नाही म्हणुन त्यांना सावकाराकडुन कर्ज घ्यावे लागते व त्यातच त्यांचा सर्वनाश होतो. एकनाथची बायको अलका हिला खेडयात राहणे आवडत नाही तिला शहरात चांगले वाटते तेंव्हा ती अनेक प्रयत्न करते. एकनाथला सोडुन जाते. यातुन जागतिकी करणाने शहरी करणासाठी जी प्रलोभन तयार केली त्याचा सामाजिक, आर्थिक जीवनावर कसा प्रभाव पडला याचे चित्रण बारोमास मधुन दिसुन येते.

कोकणच्या जगजीवनावर जागतिकी करणाने निर्मान केलेले माणसांची आगतिका 'चाळेगत' या कांदबरीत प्रविण बांदेकरानी विस्तुतपणे मांडली आहे. इथले मच्छीमार त्यांच्या जीवनावर झालेले दृष्यपरीनाम, जागतिकी करणातुन आलेला चंगळवाद, उच्चशिक्षितपण शिपायाच्या पदासाठी प्रयत्न करणारे बेरोजगार आलुतेदारी व बलुतेदारी यांची झालेली मोडतोड, यांत्रिकीकरणातुन होणारी पर्यावरणाची हानी, पारंपारिक व्यवसाय करणा–या भुमीपुत्रांचे विस्थापीत व नामशेष होणे, माघ्यमांचे हिडीस प्रक्षेपण लोकांचा चाललेला संघर्ष, हत्ती तस्करांचा धुडगुस आदी विषयावर बांदेकरांनी सुक्ष्म तपशिलासह चित्रण केले आहे. तसेच अत्याधुनिक यंत्रांच्या साहाय्याने एका प्रयत्नात हजारो मासे पकडले जात आहे. नको असलेले जीवही त्यातुन नाहीशे होतात संबध प्रदेश जागतिकी करणामुळे नियंत्रित केला जातो या प्रदेशाची सामुहिक वेदना 'चाळीगत' मधुन व्यक्त झाली आहे.

जागतिकीकरणामुळे समाजात झटपट श्रीमंत होण्याची लाटच आणली आहे. सर्वजन एकारात्रीच श्रीमंत होण्यासाठी धडपडत आहेत. याचा परीनाम माणसांच्या नैतिकतेत बदल होण्यात झाला आहे. श्रीमंत होण्यासाठी सर्वच मार्ग स्विकारण्याचे, पत्करण्याचे धाडस येथील लोक करतांना दिसत आहेत. या मागे नैतिक करणे जशी आहेत तशीच सामाजिक करनेही आहेत. शिपायापासुन वरीष्ठा पर्यंत सर्वच जण भ्रष्टाचारात अडकले आहेत. याचे प्रभावी चित्रण राजन

 ISBN-978-93-5311-692-7

गवस यांच्या 'ब,बळीचा' या कांदबरीत आहे या कांदबरीत रेशन कार्डावरील नाव कमी करण्यासाठी एका म्हता–याला तहसिल मधिल नायब तहसिलदार 50 रूपये मागतो. सरळ व्यवहार असतांना सुध्दा पैसे द्यावे लागतात त्यामुळे म्हतारा चिडतो. या कांदबरीतील केतकरी हा तहसिल कार्यालयात कारकुन आहे. त्याच्या पासुन काहीच फायदा होत नसल्यामुळे त्याला रॉयल्टी गोळा करण्यासाठी पाढवतात या वरून आता हे सर्व चित्रण मराठी कांदबरी येत असल्याचे दिसुन येते.

गेल्याकाही वर्षात एसईझेट म्हणजेच विशेष आर्थिक क्षेत्र या नावाखाली भांडवली मल्टीनॅशनल कंपण्याचा जो नंगानाच चालु आहे. या विषय सुत्रावरील शंकर सखाराम यांची 'एसईझेड' ही कांदबरी या कांदबरीचे आशयसुत्र या जागतिकी करणाच्या व्युहनीतीने आणि तिच्या प्रभावाने व्यापलेले आहे. क्षेत्र च्या निमित्ताने नवसाम्राज्यवादी वासहतिक धोरणे हळुहळु गावा पर्यंत कसे पाहेचत आहे. त्याचे चित्रण आहे हजारो वर्षापासुन ते लोक शेतजमिनीवर अवलंबुन आहेत. ती सुपीक जमिनच कंपण्यासाठी घेण्याच्या षडयंत्राचे चित्रण कांदबरीत आहे.

एकुणच गेल्या दोन दशकातील जागतिकी करणाच्या संदर्भातील प्रकीयेचे काही पडसादरूपी चित्रण मराठी कांदबरीतुन आल्याचे दिसुन येते. येण्या–या काळात हे जागतिकीकरण आणखी तिव्र आणि अपरिहार्य होणार आहे. या सर्वांचे चित्रण तेवढयाच ताकदीने मराठी कांदबरीत येणे गरजेचे आहे.

**संदर्भग्रंथ :**

1) सदानंद देशुमख, बारोमास,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
च.आ.2012.
2) जागतिकीकरणा नंतरचे मराठी साहित्य,संपा,प्रा.कोत्तापल्ले व प्रा.भगत.
सायन पब्लिकेशन,पुणे 2017.
3) डॉ.प्रतिमा इंगोले आगळे अनुभव विश्व, संपा.डॉ.हेर्लेकर व डॉ.आपटे
दिलीपराज प्रकाशन,पुणे 2006.